मुंबई विद्यापीठ

# UNIVERSITY OF MUMBAI

'नॅक' पुनर्मुल्यांकित – 'अ' श्रेणी

***Re-ACCREDITED WITH 'A'GRADE BY NAAC***

दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ रोजी झालेल्या
अधिसभेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

●

Minutes of the Ordinary Meeting of the Senate
held on 19th November, 2015.

मुंबई विद्यापीठ

# UNIVERSITY OF MUMBAI

<u>'नॅक' पुनर्मुल्यांकित – 'अ' श्रेणी</u>

***<u>Re-ACCREDITED WITH 'A'GRADE BY NAAC</u>***

दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ रोजी झालेल्या

अधिसभेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

●

Minutes of the Ordinary Meeting of the Senate

held on 19th November, 2015.

# मुंबई विद्यापीठ

मसुदा | | अधिसभा
--- | --- | ---
क्र. १-२०१५-२०१६ | | १९ नोव्हेंबर, २०१५

अधिसभेची सर्वसाधारण सभा विद्यापीठाचे सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन येथे गुरूवार दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता सुरू झाली सभेमध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते –

१. डॉ. संजय व्ही. देशमुख (कुलगुरू)

२. श्री. विवेक देवळणकर

३. डॉ. अनिल पाटील

४. डॉ. (श्रीमती) मनाली लोंढे

५. श्री. भुजंग कि. अहिरे

६. डॉ. दिलीप एस. पाटील

७. डॉ. एम. ए. खान, (सचिव)

८. डॉ. अनिल कर्णिक

९. डॉ. मंजिरी कामत

१०. श्री. ए. एस.एम. सुंदरम

११. श्री. मच्छिंद्रनाथ र. डोईफोडे

सभेची सुरूवात 'वंदे मातरम्' या गीताने झाली.

कुलगुरू यांनी स्वत: तसेच विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने उपस्थित असलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचे मनापासून स्वागत केले.

श्रीमती नईमुन्नीसा बेगम मगदुमए श्री. मगदुम अहमद खान, माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, श्री. भालचंद्र ऊर्फे अण्णा पेंढारकर, डॉ. सय्यद अहमद, श्रीमती पार्वतीबाई पाटील, श्री. अशोक सिंघल यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त करून त्यांना पुढील शब्दात श्रध्दांजली वाहिली.

➢ श्रध्दांजली –

**श्रीमती नईमुन्नीसा बेगम मगदुम खान**

मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. मकसुद मगदुम खान यांच्या मातोश्री नईमुन्नीसा बेगम मगदुम खान यांचे दिनांक १ जुन, २०१५ रोजी निधन झाले. त्या ७२ वर्षाच्या होत्या.

**श्री. मगदुम अहमद खान**

मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. मखसुद मगदुम खान यांचे वडील श्री. मगदुम अहमद खान यांचे दिनांक १२ मे, २०१५ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने आकस्मिक निधन झाले. त्याबद्‌ल विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेतर्फे त्यांना पत्र लिहावे असा ठराव मांडला.

**माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम**

मुलांचे लाडके 'कलामचाचा', 'मिसाईल मॅन' अशी ख्याती असलेले शास्त्रज्ञ आणि लोकप्रिय माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे हदयविकाराने दिनांक २७ जुलै, २०१५ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८४ वर्षांचे होते.

**श्री. भालचंद्र ऊर्फे अण्णा पेंढारकर**

संगीत रंगभूमीचा चालताबोलता इतिहास असलेले मराठी रंगभूमीवरील अष्टपैलू व्यक्तिमत्व श्री. भालचंद्र पेंढारकर यांचे वृध्दापकाळाने दिनांक ११ ऑगस्ट, २०१५ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९४ वर्षांचे होते.

**डॉ. सय्यद अहमद**

मणिपूरचे राज्यपाल आणि महाराष्ट्राचे माजी मंत्री डॉ. सय्यद अहमद यांचे दिनांक २८ सप्टेंबर २०१५ रोजी निधन झाले.

**श्रीमती पार्वतीबाई पाटील**

मुंबई विद्यापीठाचे संचालक डॉ. दिलीप पाटील यांच्या मातोश्री पार्वतीबाई पाटील यांचे दिर्घ कालीन आजाराने दिनांक १२ आक्टोंबर २०१५ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८२ वर्षांचे होते.

**श्री. अशोक सिंघल**

विहिंपचे ज्येष्ठ नेते श्री. अशोक सिंघल यांचे ह्यदयक्रिया बंद पडल्याने दिनांक १७ नोव्हेंबर २०१५ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८९ वर्षांचे होते.

तसेच मुंबई विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी जे या काळात निधन पावले त्यांनाही श्रंध्दाजली वाहण्यात येते.

त्यानंतर अध्यक्षांनी कार्यक्रमपत्रिकेवरील बाब क्र. १ अधिसभेपुढे मंजूरीसाठी मांडली.

यानंतर अधिसभेच्या कामकाजाला सुरूवात करताना मा. कुलगुरूंनी स्वत:च्या तसेच विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे हार्दिक स्वागत केले.

**बाब क्र. १ : दिनांक २४ व २५ मार्च, २०१५ रोजी झालेल्या अधिसभेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त संमत करणे.**

सर्व सभासदांच्या मान्यतेनुसार इतिवृत्त मान्य करण्यात आले.

**बाब क्र. २ : महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक, डॉ. अनिल पाटील यांनी बृहत आराखडा सभेपुढे विचारार्थ सादर केला.**

बृहत आराखडया विषयी बोलताना मा. कुलगुरू म्हणाले की, बृहत आराखडयाचा मसुदा तयार करण्यासाठी समिती गठित केली होती. समितीच्या अनेक बैठका झाल्या असून समितीने इत्यंभूत माहिती संकलित करून व विद्यापीठ क्षेत्रातील मागणीचा विचार करून बृहत आराखडा तयार केला आहे. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियमातील तरतुदी लक्षात घेऊन आजच्या बैठकीत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ चा बृहत आराखडा सादर करण्यात आला.

यानंतर मा. कुलगुरूंनी डॉ. अनिल पाटील यांना बृहत आराखडयातील महत्वाचे मद्दे मांडण्याची सूचना केली.

डॉ. अनिल पाटील यांनी महाविद्यालये आणि विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेल्या आणि व्यवस्थापन परिषद तसेच विद्वत परिषदेने सुचविलेले बदल थोडक्यात स्पष्ट केले.

सदर आराखडा बनवित असताना डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली स्थापलेल्या समितीने जे काही मार्गदर्शक तत्वे सूचीत केलेली आहेत त्या तत्वांमध्ये २१ मुदयांचा अतंर्भाव होता. त्यामध्ये ज्याठिकाणी महाविद्यालये नाहीत अशी काही उदाहरणे आपल्या विद्यापीठाच्या अधिपत्याखाली आहेत. आपल्या ५ जिल्हातून असा काही प्रस्ताव आला तर त्याला आपण मान्यता देणार आहोत. त्याच प्रमाणे

आदिवासी आणि दुर्गम भाग जो आहे त्यांना शिक्षणाच्या मुळ प्रवाहात आणण्याच्या दृष्टिने या ठिकाणी महाविद्यालये असावी असा या समितीच्या मार्गदर्शक तत्वात आहे आणि त्या नुसार नव्याने निर्माण केलेल्या पालघर जिल्हयात आणि ठाणे ग्रामीण तसेच रायगड जिल्हयात जिथे आवश्यक आहे व ज्याठिकाणी महाविद्यालये नाहीत कोणत्या महाविद्यालयाने प्रस्ताव पाठविला तर आपण त्यांच्या प्रस्तावास आपण मान्यता देणार आहोत.

शिक्षणाच्या मुळ प्रवाहातून थोडेसे दुर राहिलेले आर्थिक किंवा सामाजिक परिस्थिती असेल पण त्यामुळे नियमित शिक्षण घेता न येणारे विद्यार्थी आहेत त्याच्यामधून नोकरी लागलेले विद्यार्थी आहेत त्यांना पुढे शिक्षण घेता येणे शक्य नाही अशा विद्यार्थ्यांसाठी नाईट कॉलेजेस आपण मुंबईमध्ये ,उपनगर व जिल्हासारख्या ठिकाणी महाविद्यालयाचा प्रस्ताव आला आला तर आपण प्रस्तावास मान्यता देणार आहोत.

राष्ट्रीय पातळीवरच्या मुद्द्यांनुसार स्किल डेवल्पेंमेटला अनुसरून आपण काही डिग्री, सर्टिफिकेट व डिप्लोमा कोर्स सुरू करतो आहे. विशेषत: आपल्या किनारी भागामध्ये तसेच रायगड भागाकरिता फळ व शेतीची काही अभ्यासक्रम जर आपण सुरू केले तर सहरोजगार आणि नोकरी मिळण्याच्या दुष्टिने त्यांच्या फायदयाचे होईल. म्हणुन आपण स्किल डेवल्पेंमेटचा अंतर्भाव यामध्ये केलेला आहे.

तसेच तालुका पातळीवर विद्यार्थ्यांना एक नविन संधी मिळण्याच्या दृष्टिने विधी महाविद्यालयाचा प्रस्ताव जर तालुका पातळीवर प्राप्त झाला तर तो स्विकारून आपण विधी महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता देणार आहोत.

मा. कुलगुरू महोदयांनी एक कल्पना दिली आहे की विधी महाविद्यालयाच्या बाबतीत पदव्युत्तर अभ्यासक्रम आहे एल.एल.एम. चा हा फक्त विद्यापीठात उपलब्ध आहे. जर जिल्हातील महाविद्यालयात असा उपक्रम चालू करायचा असेल आणि त्यांच्याकडून असा प्रस्ताव प्राप्त झाला तर आपण एल.एल.एम. अभ्यासक्रमास मान्यता देण्याचा प्रयत्न करणार आहोत.

इनोव्हेटीव्ह कोर्सेस वगळता इतर काही कोर्सेना जर अतिरिक्त तुकडीचा प्रस्ताव महाविद्यालयातून आला तर यावर्षीच्या आराखडयामध्ये आपण तसा समावेश केलेला आहे.

बी.सी.यु.डी. व व्यवस्थापन परिषदेमध्ये झालेल्या चर्चेत जी शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत त्यातील काही शासनाचे पॉलिटेक्निक कॉलेज आहेत त्यातील काही पॉलिटेक्निक कॉलेज प्रत्येक जिल्हातील एक महाविद्यालय शासकिय अंभियांत्रिकी महाविद्यालय म्हणून रूपांतरित केल जाणार आहे. त्यामुळे आपण आपल्या आराखडयामध्ये असे म्हटलेल आहे आपल्या मुंबई विद्यापीठाच्या अधिपत्याखाली अशा प्रकारचे जर अंभियांत्रिकी महाविद्यालय आले तर त्याला आराखडयानुसार मंजुरी आपण देणार आहोत. आराखडयामध्ये तशी तरतुद करून ठेवलेली आहे.

काही नविन अभ्यासक्रम आपण या आराखडयामध्ये ठेवलेले आहेत. बी.ए. (इंटिरिअर डिजाईन) हा व्यावसायिक दृष्टया शिक्षणक्रम आहे बी.ए.(इंटिरिअर डिजाईन) हा तीन वर्षाचा अभ्यासक्रम सुरू करतो आहे आणि त्याचे वैशिष्ट असे आहे की, हा आर्किस्टेक्चरचा शिक्षणक्रम नाही पण बी.ए. मध्ये हा घेता येतो. सेफ्टी फायर आणि सेफ्टी मॅनेजमेंट मधला डिग्री कोर्स सुध्दा सुरू करतो आहे. त्यामध्ये एक वर्षाचा कोर्स करेल अशाना सर्टिफिकेट मिळेल. जे दोन वर्षाचा कोर्स करतील त्यांना ॲडवांस सर्टिफिकेट मिळेल. तीन वर्षाचा कोर्स पुर्ण करेल त्यांना डिग्री मिळेल. रायगड, रत्नागिरी, ठाणे यामधील औघोगिक केंद्रे पाहिली तर चांगला संधी ही विद्यार्थ्यांना होईल. तसेच सदर कोर्स हा फक्त नागपूर मध्ये होत आहे. आपण हा कोर्स विद्यापीठात उपलब्ध करून दिल्यामुळे नोकरीची मोठी संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

नवीन कोर्स मध्ये एमबीए (स्पोर्टस मॅनेजमेंट) असा एक जो कोर्स विद्यापीठ स्तरावर ऑनलाईनद्वारे उपलब्ध करून देणार आहोत आणि त्यांच्यामधून स्पोर्टसच्या संबधी एक चांगले खेळाडू आपण निमार्ण करू शकू.

फार्मासी आणि आर्किस्टेक्चरचे महाविद्यालये जिल्हाच्या बहुतांश ठिकाणी नाही जर जिल्हातून प्रस्ताव आला, तसेच रत्नागिरी, रायगड व सिंधुदूर्ग जिल्हातून फार्मासीचा प्रस्ताव असेल तर आपण आराखडयामध्ये तरतुद केलेली आहे.

परफॉरमिंग आर्टस्, बी.ए.(फाईन आर्टस्)मध्ये म्युझिक आणि डान्स आणि काही कल्चरल कोर्सेस आहेत ते फक्त मुंबई मध्ये आहेत इतर कोणत्याही जिल्हामध्ये नाही. त्यामुळे एखादि संस्था असे अभ्यासक्रम सुरू करण्यास जर पुढे आली आणि त्याच्याकंडे अशा प्रकारची जर रचना असेल,तर आपण त्यांना ते कोर्सेस देणार आहोत.

डॉ.(श्रीमती) मनाली लोंढे यांनी डॉ. पेठे आणि समितीचे अभिनंदन केले.

बृहत आराखडया संदर्भातील चर्चेत सहभागी झालेल्या सन्माननीय सदस्यांनी ज्या चांगल्या सूचना केल्या आहेत त्यांचा यापुढे बृहत आराखडा तयार करताना अवश्य विचार केला जाईल असे आश्वासन महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक, डॉ. अनिल पाटील यांनी दिले व बृहत आराखडा सर्वानुमते मान्य करण्यात आला.

**बाब क्र. ३. परीक्षा फी वाढ व परीक्षा काळात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग यांचे परीक्षा काळातील मानधनात वाढ करण्यातबाबत.**

मा. कुलगुरूंच्या आदेशानुसार परीक्षा नियंत्रक यांनी सदनाच्या असे निदर्शनास आणले की, परीक्षेच्या रेम्युनरेशनसाठी परीक्षक, पेपर सेटर्स, मॉडरेटर, यांना देण्यात येणा-या मानधनामध्ये मागील ब-याच वर्षापासून वाढ झालेली नाही. तसेच यासंदर्भात ब-याच परीक्षकांकडून अशी मागणी झालेली आहे की, पेपर तपासायचे मानधन ८० रूपये आहेत. ते कमी आहे. त्यामुळे पेपर तपासणी करायला परीक्षकांकडून कमी प्रतिसाद मिळतो. तसेच यासंदर्भात विद्यापीठाचे जे परिनियम क्र.४८३ आहेत. ते सन २००१ मध्ये तयार केलेले आहेत. त्यामुळे सदर परिनियम अद्यायावत होणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने असे सुचीत केले की, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ चे कलम २८(W) नुसार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेला पुढीलप्रमाणे परिक्षेचे मानधन, रेम्युनरेशन ठरविण्याबाबतचे अधिकार आहेत.

> "28 : The Management Council shall exercise the Following powers and perform the Following duties, namely (w) prescribed honorana, remunerations, and fees and travelling and other allowance for paper setters, examiners and other examinations staff, visiting faculty, and for such other services rendered to the University".

मुंबई विद्यापीठातील अधिनियम, १९७४ नुसार तयार केलेले परिनियम नव्याने तयार व्हायला हवेत. त्यानुसार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २९ मे, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत बाब क्र. २८ अन्वये सदर बाब ठेवण्यात आली होती. व त्याअनुषंगाने पुढील प्रमाणे ठराव पारित केला.

"Resolved that the proposal in the form of Report of Dr. Gadade committee for revision in Examination fees and remuneration to the faculties and staff engaged in Examination work be accepted"

त्या अनुषंगाने असे ठरविण्यात आले की, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने दिनांक २८ मे, २०१५ रोजी बाब क्र. २८ अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार मान्य केलेली सुधारीत परिक्षा फी वाढ व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांना देण्यात येणा-या मानधनात वाढ करण्याबाबतच्या परिनियम तयार करून कुलपतिंच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात येत आहे.

The Hon'ble Vice Chancellor thanked all the member of the Senate, Academic Council Management Council, B.C.U.D for co-operation also members of the committee who prepared draft of the perspective plan as per the new guidelines of the Government Maharashtra for support.

The Hon'ble Vice Chancellor also thanked Registrar, Director, B.C.U.D. Finance & Accounts officer, Controller of Examination and all the concerned Officers and Staff of the University for their co-operation and support.

सभेची सांगता "राष्ट्रगीताने" झाली.

मुंबई : ४००० ०३२.
२१ मार्च, २०१६

कुलसचिव
(मुंबई विद्यापीठ)